# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुसरे कार्यालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर जवळ, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३, ता. अंबरनाथ जि. ठाणे
ईमेल- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट- http://kbmc.gov.in

**जावक क्रमांक/कु-ब.न.प./नरवि/ 1480 /२०२१-२०२२** **दिनांक: २९/०८/२०२१**

**अपेंडीक्स - I**

## बांधकाम पूर्णतेचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र

**प्रति,**
**श्री. गणेश बाळाराम पवार व इतर**
**द्वारा श्री.प्रमोद व्ही.पाटील (अभियंता), अंबरनाथ**

श्री.प्रमोद व्ही.पाटील.अभियंता, बांधकाम परवाना क्र.५७ यांचे दि.२३/०९/२०१९ व दि.०३/०८/२०२१ रोजीचे अर्जावरुन दाखला देण्यात येतो की, त्यांनी कुळगांव-बदलापूर नगरपरिषद हद्दीत स.नं.१७३, हि.नं.१, प्लॉट नं.१, मौजे बदलापूर, ता.अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांचे कडील बांधकाम परवानगी जा.क्र.कुबनप/बांप/५५८९-६१, दि.०३/०८/२०१८ अन्वये मंजूर केलेल्या नकाशांप्रमाणे राहणेसाठी व वाणीज्यसाठी बांधकाम पूर्ण केले आहे. तरी खालील अटींवर बांधकाम पूर्णतेचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे. (बांधकाम पूर्ण झाल्याची तारीख २१/०९/२०२१)

<table>
<tr><th>मजले</th><th colspan="5">इमारत</th><th>वापर</th></tr>
<tr><td>१) तळमजला</td><td>७ दुकाने</td><td colspan="4">भागस्टिल्ट</td><td rowspan="6">रहिवास<br>+<br>वाणीज्य</td></tr>
<tr><td>२) पहिला मजला</td><td>--</td><td>७</td><td>सदनिका</td><td>१६</td><td>खोल्या</td></tr>
<tr><td>३) दुसरा मजला</td><td>--</td><td>७</td><td>सदनिका</td><td>१६</td><td>खोल्या</td></tr>
<tr><td>४) तिसरा मजला</td><td>--</td><td>७</td><td>सदनिका</td><td>१६</td><td>खोल्या</td></tr>
<tr><td>५) चौथा मजला</td><td>--</td><td>७</td><td>सदनिका</td><td>१६</td><td>खोल्या</td></tr>
<tr><td>एकूण-</td><td>७ दुकाने</td><td>२८</td><td>सदनिका</td><td>६४</td><td>खोल्या</td></tr>
</table>

**सबब, वरील जागेतील इमारत श्री.प्रमोद पाटील, अभियंता यांच्या देखरेखीखाली पूर्ण झालेली आहे, झालेले बांधकाम हे मंजूर नकाशानुसार आहे. सबब, खालील अटींचे अधीन राहून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.**

१ जेव्हा सज्जा (बाल्कनी) बंदिस्त करण्यात आला/आली असेल तर त्याचे समोरील व वरील १/३ क्षेत्रासाठी, लुवर्स ग्लास, शटर्स अथवा ग्रील्स लावणे, अनिवार्य राहील व पॅरोपेट सोडून उर्वरित समोरील क्षेत्रासाठी ग्लेजड शेटर्स बंदिस्त करणे आवश्यक राहील. तसेच नकाशात दर्शविलेले कॉर्नेस, ओर्नामेंटल प्रोजेक्शन बंदिस्त करणेत येऊ नये.

२ तळमजल्यास व टेरेस फ्लोअरला इलेवेशनल प्रोजेक्शन/ कॉर्नीस/ फ्लॉवरबेड असतील तर ते बंदिस्त करणे अनुज्ञेय असणार नाही. तसेच आजूबाजूच्या सामासिक अंतरात कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

३ भोगवटा प्रमाणपत्र सोबत दर्शविलेले नकाशातील बांधकामा व्यतिरिक्त इतर बांधकाम हे अनधिकृत समजण्यात येवून त्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४ भविष्यात सामासिक अंतरातील जागा नगरपरिषदेस रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक भासल्यास हस्तांतरीत करावी लागेल. टेरेस व पॉकेट टेरस बंदिस्त करु नये.

५ पावसाळी पाणी वाया जावू नये यासाठी रेनवॉटर हार्वेस्टिंग करणेत यावे व पाणी जमीनीमध्ये मुरवावे.

६ सुका व ओला कचरा अलगीकरणासाठी व साठा करण्यासाठी स्वतंत्रपणे जागा निर्धारित करुन कचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी संयंत्र उभारण्याची जबाबदारी विकासकाची आहे.

कुळगांव-बदलापूर नगरपरिषद कुळगांव

**सहाय्यक नगर रचनाकार**
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

**मुख्य अधिकारी तथा नियोजन प्राधिकारी**
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

**प्रत, कर विभाग, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद**